Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# शेतक-यांचे अभ्यास दौरे (राज्याबाहेरील) आयोजित करणे

प्रस्तावना

पशुसंवर्धनाच्या माध्यमातून शेतकरी पशुपालकांचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करणे अत्यंत आवश्यक आहे. एखादी यशोगाथा प्रत्यक्ष पाहिल्यानंतर शेतक-यांचा त्यावर विश्वास बसतो व अशा यशोगाथांची पुनरावृत्ती होऊ शकतो. प्रकल्पांतर्गत १८ जिल्हयातील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हयातील प्रगतीशिल पशुपालकांची (प्रति जिल्हा ६ पशुपालकांची) निवड करावी. तथापी  यवतमाळ,बीड,धुळे,ठाणे, सोलापूर जिल्हयांमध्ये ६+१ म्हणजे ७ शेतक-यांची निवड करण्यात यावी.  प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन मुख्यालयातील जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या संयुक्त विद्यमाने अभ्यास दौ-याचे नियोजन करावे.

कार्यक्षेत्र

महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम विकास प्रकल्पांतर्गत प्रकल्पाच्या १८ जिल्ह्यांतील  पशुपालक या अभ्यास दौ-यासाठी पात्र राहतील. प्रतिवर्षी ३० शेतक-यांचा एक गट या प्रमाणे प्रकल्प कालावधीत एकूण  १५० शेतक-यांना या उपघटकाचा लाभ देण्यात यावा.

उपघटकाचे स्वरूप

शेतक-यांच्या राज्याबाहेरील अभ्यास दौ-याचे नियोजन प्रादेशीक सहआयुक्त पशुसंवर्धन पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती यांनी करावी.  त्यांना मुख्यालयाच्या जिल्ह्यांचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती) संयुक्तरित्या दौ-याचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी पूर्ण सहाय्य करावे. या अभ्यास दौ-यामध्ये आधुनिक पणन व्यवस्थापन अवलंब केलेल्या राज्याबाहेरील जनावरांच्या बाजारांना भेटी आयोजित करण्यात याव्यात. उदा. आनंद, गुजरात येथील राष्ट्रीय डेअरी विकास संघ, अमुल सहकारी संस्था, सफल बाजार बेंगलोर इ. आधुनिक उत्पादन तंत्राबरोबर पशुजन्य उत्पादनांची  गुणवत्ता वाढविणेच्या तंत्रज्ञानावर भर देणारी संस्था  जसे, भाग्यलक्ष्मी  डेअरी तसेच पशुपालकांचा संघ स्थापून यशस्वीरित्या प्रक्रिया व विपणन व्यवस्थापन यशस्वी केलेल्या संस्थांना भेटी आयोजित करण्यात याव्यात. दौ-याचे नियोजन व्यवस्थीत करून मगच शेतक-यांना जबाबदार अधिका-यांसह दौ-यावर पाठवावे. दौ-याअंती सहभागी शेतक-यांकडून अनुभव कथन करून  घेण्यात यावे.

शेतक-यांची निवड

या अभ्यास दौ-यासाठी शेतकरी पशुपालकाची निवड तालुका पातळीवर संबंधित पशुधन विकास अधिकारी विस्तार यांनी करावी.

निवडीचे निकष

अभ्यास दौ-यासाठी निवड करावयाच्या पशुपालकाच्या निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) निवडलेल्या शेतक-यांकडे दुधाळ जनावरे/कुक्कुट/ पक्षी असणे अत्यावश्यक आहे.

२) पुरस्कार प्राप्त पशुपालकांना प्राधान्य देण्यात यावे

३) शेतक-यांकडून अभ्यास दौ-यासाठी संमती पत्र घेणे आहे.

४) शेतक-यांचा वयोगट २१ वर्षे ते ५० वर्ष इतका असावा.

५) बचत गटांच्या (पशुसंवर्धन) सदस्यांना पुरेसे प्रतिनिधित्व /प्राधान्य देण्यात यावे.

६) अन्य शेतकऱ्यांना मार्गदर्शन/अनुभव कथन करण्याची क्षमता असावी. शेतकरी/पशुपालकांची निवड जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात यावी.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

उपघटकाचे अंदाजपत्रक

या उपघटकाच्या अंमलबजावणीसाठी निधी संबधित जिल्हयाच्या आत्मा यंत्रणेमार्फ त धनाकर्षाव्दारे /धनादेशाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे उपलब्ध होणार आहे. या अभ्यास दौ-यासाठीची अंदाजपत्रकीय तरतूद खालील प्रमाणे आहे. ३० शेतक-यांच्या एका गटासाठी रू. १ लाख ८०,०००/- रूपये इतकी कमाल तरतूद आहे. यामध्ये प्रवास खर्च, जेवण व मुक्काम यांचा समावेश आहे. यानुसार प्रकल्प कालावधीत एकुण ५ गटांच्या अभ्यास दौ-यांचे आयोजन करण्यासाठी रू. ९.०० लाख तरतूद केली आहे

उपघटकाची अंमलबजावणी व संनियंत्रण

तालुका पातळीवर शेतक-यांचे निवड अर्ज पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती (विस्तार) यांचे शिफारशीसह जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेमार्फत जिल्हा निवड समितीकडे सादर करावे. जिल्हा निवड समितीने शेतक-यांची अंतिम निवड करावी. निवडलेल्या शेतक-यास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी नियोजित केलेल्या अभ्यास दौ-यासाठी पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार यांचेमार्फत निवड केलेल्या शेतक-यांस अवगत करून पाठवावे. प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी दौ-याचे व्यवस्थीत नियोजन करून मगच शेतक-यांना जबाबदार अधिका-यासह दौ-यावर पाठवावे प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी संयुक्तरित्या या उपघटकाची अंमलबजावणी व संनियंत्रण करावे.

फलनिष्पत्ती

या अभ्यास दौ-यामुळे शेतकरी/पशुपालकांना विविध बाजार व्यवस्थापन संस्था नवीन तंत्रज्ञान अवलंबलेल्या संस्थांना भेटी दिल्यामुळे त्यांच्या ज्ञानात/अनुभवात भर पडेल. बाजार विषयक ज्ञान अद्यावत आणि समृद्ध होईल. नवीन तंत्रज्ञान स्विकारण्याची मानसिकता निर्माण होईल व सहभागी शेतकऱ्यांच्या अनुभव कथनाव्दारे इतरांना या ज्ञानाचा फायदा होईल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

शेतक-यांचे अभ्यास दौरे (राज्याबाहेरील) आयोजित करणे - वर्षनिहाय / जिल्हावार भौतिक उद्दिष्टांचे विवरण

| अ. क्र. | मोठया जनावरांचे बाजार (गाय + म्हैस) | | एकुण भौतिक उद्दिष्ट | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजाराचे नाव | जिल्हा | | | | | | |
| १ | चांदुर बाजार | अमरावती | ६ | ६ | ० | ० | ० | ० |
| २ | करंजा | वाशिम | ६ | ६ | ० | ० | ० | ० |
| ३ | पुसद | यवतमाळ | ७ | ७ | ० | ० | ० | ० |
| ४ | मेहकर | बुलढाणा | ६ | ६ | ० | ० | ० | ० |
| ५ | नेवासा | अहमदनगर | ७ | ७ | ० | ० | ० | ० |
| ६ | कर्जत (शेळी मेंढी बाजार) | अहमदनगर | ६ | ६ | ० | ० | ० | ० |
| टप्पा १ एकूण | | | ३८ | ३८ | ० | ० | ० | ० |
| ७ | सावनेर | नागपुर | ६ | ० | ० | ६ | ० | ० |
| ८ | लाखनी | भंडारा | ६ | ० | ० | ६ | ० | ० |
| ९ | आमगाव | गोंदिया | ६ | ० | ० | ६ | ० | ० |
| १० | कडा | बीड | ७ | ० | ० | ७ | ० | ० |
| ११ | सांगोला | सोलापुर | ७ | ० | ० | ७ | ० | ० |
| १२ | अकलुज | सोलापुर | ६ | ० | ० | ६ | ० | ० |
| टप्पा २ एकूण | | | ३८ | ० | ० | ३८ | ० | ० |
| १३ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | ६ | ० | | ० | ० | ६ |
| १४ | पाचोरा | जळगाव | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| १५ | अंमळनेर | जळगाव | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| १६ | शिरपुर | धुळे | ७ | ० | ० | ० | ० | ७ |
| १७ | वसई | ठाणे | ७ | ० | ० | ० | ० | ७ |
| १८ | खेड | पुणे | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| १९ | लोणंद | सातारा | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| २० | सांगली | सांगली | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| २१ | वडगाव पेठ | कोल्हापुर | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| २२ | आटपाडी (शेळी मेंढी बाजार) | सांगली | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| २३ | दौंड (शेळी मेंढी बाजार) | पुणे | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| २४ | दहीवडी (शेळी मेंढी बाजार) | सातारा | ६ | ० | ० | ० | ० | ६ |
| | टप्पा ३ एकूण | | ७४ | ० | ० | ० | ० | ७४ |
| | एकुण | | १५० | ३८ | ० | ३८ | ० | ७४ |